शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक १९ वा एप्रिल २०१४
त्रैमासिक क्र. २
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 41 अंक : 19 कोल्हापूर ता. .... एप्रिल 2014 किंमत दोन रुपये Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur RMS

## भिडे कुलसंमेलन – २०१४ एक आनंदोत्सव

भिडे कुलसंमेलन डोंबिवली येथे दि. ४ व ५ जानेवारी रोजी शगुन हॉलमध्ये संपन्न झाले. एक आदर्श संमेलन करावे अशी इच्छा कार्यक्रमाध्यक्ष अरविंद भिडे, सुभाष भिडे इत्यादींनी व्यक्त केली होती. यावर्षी प्रथमच देवेन्द्र, प्रदीप आणि वैभवी ही तरुण मंडळीही सामील झाली. साहजिकच तरुणांचा उत्साह बघून जेष्ठ मंडळींनी आळस झटकला. प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष व दूरदर्शन निवेदक प्रदीप भिडे यांनी पहिल्या दिवशी उद्‌घाटनाला येण्याचे मान्य केले. बघता बघता संमेलनाचा दिवस ४ जानेवारी उजाडला. कार्यकर्ते व बाहेर गावची भिडे मंडळी दुपारीच येण्यास सुरूवात झाली. सूत्रसंचलन सांभाळणाऱ्या वैभवी व वृषाली यांनी डोंबिवली कल्याणचे सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्व सांगून कार्यक्रमाची छान सुरुवात केली. प्रमुख उद्‌घाटक प्रदीप भिडे व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व देवांच्या फोटोला पुष्पहार घातले. मग अमित भिडे याने गणेश वंदन करून ओंमकार स्वरूप म्हटले व चांगल्या वातावरणाची निर्मिती केली. नंतर कार्यक्रमाध्यक्ष अरविंद भिडे यांनी पाहुण्यांना पुष्पगुच्छ देऊन प्रतिष्ठानतर्फे सर्वांचे स्वागत केले. परंपरेप्रमाणे ज्ञात अज्ञात निधन झालेल्या भिडे मंडळींना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रतिष्ठानचे सचिव प्रभाकर भिडे यांनी प्रतिष्ठानची गेल्या वर्षभरातील कार्य व वाटचाल यासंबंधी माहिती सांगितली. त्यांनी प्रथम कुलवृत्ताची सुरूवात कशी झाली व त्यानंतर प्रतिष्ठानकडून दिली जाणारी शिक्षण व वैद्यकीय मदत यासंबंधी माहिती सांगितली. तसेच कुलवृत्तासाठी माहिती संकलित करताना कल्याण डोंबिवली मधील भिड्यांची माहिती व अनुभव सांगितले.

भिडे प्रतिष्ठानमध्ये पाच भिडे भगिनींची महिला विभाग सदस्य म्हणून नियुक्ती केली. त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीत नव्याने समाविष्ट झालेल्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष माधवराव भिडे यांनी तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसायात पडावे. व त्याकरिता प्रतिष्ठान सर्व मदत करण्यास तयार असल्याचे सांगितले. भिडे मंडळींनी चांगल्या मार्गाने मेहनतीने भरपूर पैसे मिळवावे व अवघे होऊ श्रीमंतचा प्रयत्न करावा असे प्रतिपादीले. संमेलन उद्‌घाटक श्री. प्रदीप भिडे यांनी आपले



मनोगतात देशामधील चालू घडामोडीची कल्पना दिली. तसेच ब्राह्मण मंडळींनी राजकारणात कुलाचा व देशाच्या भवितव्याचा विचार करून कामात सहभाग वाढवावा. त्यांचे विचार ऐकून एखाद्या कुटुंबप्रमुखाने कुटुंबातील मंडळींना आपुलकीने प्रेमाने बोलून सत्य परिस्थिती समजून सांगावी असे वाटले.

भिडे प्रतिष्ठानतर्फे प्रसाद रमेश भिडे यांना कला पुरस्कार श्री. प्रदीप भिडे यांचे हस्ते देण्यात आला. अमोल भिडे यांनी जपानमध्ये शिकलेल्या जादुच्या प्रयोगाची गंमतीदार पद्धतीने प्रात्यक्षिके दाखवून सर्व भिडे मंडळींचे चित्त वेधून घेतले. अमोल भिडे स्वतः जपानमध्ये उच्च पदावर नोकरी करून फावल्या वेळेत जादुचे प्रयोग करतात. त्यांनी जपानमध्ये दोनशेच्यावर प्रयोग केले असून भारतात ५-६ प्रयोग केले आहेत. सर्व प्रयोगात कमीतकमी शब्दांचा वापर करून कृतीवर भर दिला असल्याचे दिसून आले. सहसचिव दिलीप भिडे ह्यांनी अमोल भिडे ह्यांची ओळख करून दिली. कल्याणचे विनय भिडे यांनी पथनाट्य पद्धतीने नाट्य प्रवेश सादर केले. प्रतिष्ठानचे माजी सचिव कै. दामूकाका भिडे यांची ५ वर्षाची नात निशा हिने कथ्थक नृत्य सादर केले. त्या चिमुरडीने केलेले नृत्य सर्वांना आवडले. या सर्व यशस्वी कार्यक्रमानंतर सर्वांनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. आणि पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० ला कार्यक्रमाची सुरूवात झाली. सूत्रसंचालिका वैभवी व वृषाली भिडे यांनी पारंपारिक वेष (नऊवारी साडी, नथ वगैरे) परिधान करून उत्साहाने कार्यक्रमाला सुरूवात केली. प्रारंभी अध्यक्षांच्या हस्ते आम्ही भिडे - प्राजक्त

त्रैमासिकाचे प्रकाशन झाले. या मासिकात भिडे मंडळींचे लेख, कविता, तसेच ज्यांच्या विवाहास पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत अशा सुवर्ण सोहळ्याच्या आठवणी दिल्या आहेत. यावेळी सचिव प्रभाकर भिडे यांनी आम्ही भिडे हे एक संपर्क माध्यम आहे. भिडे मंडळी चांद्यापासून बांद्रयापर्यंत महाराष्ट्रात सर्वत्र राहतात. त्यांच्याशी संवाद साधण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यामध्ये चांगले लेख, कविता, अनुभव असतात. तरी सर्व भिडे मंडळींनी अंक वाचून आपल्या प्रतिक्रिया द्याव्यात म्हणजे लिहिण्याचा उत्साह वाढेल. दिलीप भिडे यांनी त्रैमासिकाची आर्थिक व तांत्रिक बाजू व त्यासंबंधीच्या अपेक्षा याविषयी आपले मनोगत सांगितले. नंतर कार्यक्रम विद्यार्थी गुण गौरव संपन्न झाला.

त्यानंतर श्री. सुधीर जोगळेकरांच्या हस्ते जेष्ठांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला आणि मग जेष्ठांनी आपली मनोगते व्यक्त केली.

यावर्षी प्रथमच संमेलनामध्ये भिडे मंडळींमधील 'विशिष्ट कामगिरी' करणाऱ्या कल्याणचे श्री. गोपाळ कृष्णाजी भिडे कुलबंधुचा सत्कार केला. ते 'संपदा इन्व्हेसमेंट' तर्फे गुंतवणुकीचा स्वतंत्र व यशस्वी व्यवसाय ते गेली २०-२५ वर्षे करीत आहेत. त्यांनी आपल्या भाषणात भिडे प्रतिष्ठानतर्फे सत्कार हा घरचा सत्कार म्हणून अभिमानाने व कौतुकाने स्वीकारतो असे सांगितले व आपल्या दोन सुंदर कविता सादर केल्या.

यावर्षीचे प्रतिष्ठानचे सहा विशेष पुरस्कार देण्यात आले. आदर्श सून पुरस्कार मिळालेल्या सौ. उर्मिला अरविंद भिडे यांनी आपल्या जीवनात सासूबाई व इतर सासुरवाडीतील लोकांचे महत्वाचे स्थान विशद केले. माझी आई पुरस्कार सौ. प्रतिभाताईंचे दीर विजय भिडे यांनी स्वीकारला. सौ. प्रतिभाताईंचे दोन काव्य संग्रह प्रकाशित झाले असून त्यापैकी एक आताच (१५ दिवसापूर्वी) प्रसिद्ध कवी श्री. मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते झाला असे आवर्जून सांगितले. साहस पुरस्कार पुण्याच्या शैलेश भिडे यांनी स्वीकारताना हिमालयातील अनेक ट्रेक करतानाचे अनुभव सांगितले. उद्योजक पुरस्कार मुंबई येथे राहणाऱ्या उमेश विनायक भिडे यांना देण्यात आला. त्यांची नाशिक येथे फॅक्टरी आहे. उमेश भिडे मुंबई विद्यापीठातून (BE, MMS) झाले आहेत. त्यांनी आपले मनोगत सांगताना कारखाना सुरूवातीच्या काळात नुकसानीत होता व पुढे तो तोटा भरून काढून आता फायद्यात आहे असे सांगितले. अनुभव व मेहनतीने यश मिळते सुरूवातीच्या दिवसात वडिलांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. काही दिवस टाटा कंपनीत नोकरी केली. पुढे वडिलांच्या सहकार्याने कारखाना काढून यश मिळविले. चित्पावन फौंडेशनचे समन्वयक श्री. अशोक वझे यांनी डिसेंबर २०१४ मध्ये उद्योजकांचे शिबीर घेण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यात सहभाग घेऊन चित्पावन उद्योजक/व्यावसायिक यांनी आपला व्यवसाय वाढवावा हे आवाहन केले. ह्या शिबिरात अनेक तज्ञ/अनुभवी लोक येणार आहेत. तरी यामध्ये भिडे मंडळींनी सहभाग व सहकार्य करावे असे सुचविले.

संमेलनाचे पाहुणे श्री. सुधीर जोगळेकर यांनी विवेकांनद केंद्र कन्याकुमारी व विवेकानंदाच्या १५० व्या जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात आपल्या सामाजिक सहभागाबद्दल सांगून केंद्राच्या उपसंचालिका कु. निवेदिता भिडे ह्यांनी आपले जीवन केंद्राच्या कामासाठी कसे वाहून घेतले आहे हे अनुभव सांगत कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढविली.

दुपारी १२ वाजता डोंबिवलीच्या वाद्यवृंदाने अनेक मराठी हिंदी गाणी गाऊन कार्यक्रमाची उंची वाढविली. विशेषतः निवेदक मयुरेश साने यांनी उत्कृष्ट निवेदन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विशेष म्हणजे दुपारचे दोन कधी वाजून गेले हे रसिकांना कळलेच नाही इतका अप्रतिम कार्यक्रम होता. पुरणपोळीच्या सुग्रास जेवणाचा आस्वाद घेऊन सर्वांनी समाधान व आनंद व्यक्त केला.

संमेलनाच्या शेवटच्या सत्रात खुल्या चर्चेची सूत्रे पुण्याच्या दिलीप भिडे व कर्नल सुनिल भिडे यांनी हातात घेऊन लोकांच्या सूचना ऐकून त्यावर काय उपाय योजता येईल ह्याचा आढावा घेतला.

देवेन्द्र भिडे / अरविंद भिडे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

प्रभाकर शंकर भिडे, डोंबिवली
संपर्क : ९८९२५६३१५४

आम्ही भिडे अंक १९ वा

**संपादक** : श्री. शशिकुमार केशव भिडे
**कार्यकारी संपादक** : ले.क. सुनील भिडे,
**संपादक मंडळ** : श्री. प्रभाकर भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. विलास भिडे, सौ. प्रिया भिडे, श्री. विजय अ. भिडे, सौ. पूर्वा देवधर, सौ. प्रीती प्र. भिडे
**सल्लागार मंडळ** : श्री. सुनील भिडे (अभिरूची), शशिताई घुले, श्री. अरविंद भिडे, श्री. प्रभाकर वा. भिडे
**अक्षर जुळणी** : रविंद्र पाटणकर

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

**पुणे कार्यालय :**
९२, शुक्रवार पेठ, रंजन को-ऑप. हौसिंग सोसायटी,
मंडई गणपतीजवळ, पुणे ४११००२.
फोन : दिलीप भिडे - मो. ९६५७५४१२३६

**● पत्रव्यवहारासाठी पत्ता ●**
**ले.क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, निलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४

# डोंबिवली संमेलन व खुली चर्चा

२०१४ जानेवारी मध्ये डोंबिवली येथे झालेल्या भिडे कुल संमेलनाच्या शेवटच्या सत्रात खुली चर्चा हा एक ते दीड तासाचा कार्यक्रम आयोजित केला होता. मागील २०१३ च्या सातारा संमेलनापासून ही सुरुवात आपण केली. खरंतरं संमेलनाचा वेळ दीड दिवस म्हणजे अगदीच कमी वेळ असतो. बऱ्याच कुलबंधु/भगिनी/माहेरवाशीणींना आपले मनोगत व्यक्त करायचे असते. काहींना सुचना, कौतुक व तक्रार करायची असते तर काहींना संमेलनात तोचतोचपणाचा कंटाळा आलेला असतो. ह्याकरिता त्यांना काही सुचवावेसे वाटते. तसेच पुढील वर्षीचे संमेलन स्थळ ठरविण्यासाठी संमेलनासाठी आलेल्या कुलोत्पन्नांशी प्रत्यक्ष संवाद साधुन संमेलन स्थळ ठरविणे, संमेलनाच्या कार्यक्रमात किंवा नियोजनात आपण कोठे कमी पडतो तर मग त्यासाठी आपण कोणता बदल करणे अपेक्षित आहे इत्यादी सर्व गोष्टी संमेलन उत्तम होण्यासाठी अपेक्षित आहेत. थोडक्यात भिड्यांनी, भिड्यांसाठी सुरू केलेल्या ह्या अभियानास जास्तीत जास्त उपस्थिती दाखवून एकत्रित येण्यासाठी प्रतिष्ठान हे एक माध्यम आहे. प्रतिष्ठानचे कार्यक्रम वा संमेलन म्हणजे फक्त कार्यकारिणी, विश्वस्त किंवा आयोजक ह्यांनीच सहभागी होऊन साजरे करायचे असे नसून त्यामध्ये आपल्या सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे. म्हणून संमेलनासाठी, कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहा. कार्यक्रमात बदल हवा असेल तर खुल्या चर्चेत निर्भिडपणे तो मांडून योग्य ती दाद द्या ही अपेक्षा.

सातारा २०१३ संमेलनामध्ये व्यासपीठावर महिलांनासुद्धा वाव द्यावा त्यादृष्टीने डोंबिवली संमेलनामध्ये दोन महिला भगिनींना व्यासपीठावर वाव देऊन त्याची अंमलबजावणी केली. डोंबिवली संमेलनाच्या चर्चासत्रामध्ये सुद्धा आलेल्या सूचनांचा विचार मार्च २०१४ च्या कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये झाला. त्यानुसार श्री. शरदराव भिडे ह्यांनी सुचविल्याप्रमाणे संमेलन निमंत्रणे वेळेवर मिळत नाहीत किंवा स्थानिक वृत्तपत्रात निवेदन देणे ह्याप्रमाणे संमेलन निमंत्रणे १ महिना अगोदर आणि स्थानिक वृत्तपत्रात दोन महिने अगोदर निवेदन देण्यासंबंधी निर्णय झाला. श्री. शामराव भिडे, सांगली ह्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा संमेलन हॉलचे दरवाजाजवळ दर्शनी भागावर लावावे आणि वेळेवर कार्यक्रम सुरू करण्याबाबत सूचना केली होती त्याप्रमाणे आगामी संमेलनात त्याप्रमाणे बदल नक्कीच होईल. श्री. वामनराव भिडे ह्यांनी आतापर्यंत झालेल्या संमेलन स्थळांची यादी अंकात द्यावी, नवविवाहित दाम्पत्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, तरुण वर्गाची संख्या वाढविण्याकरिता त्यांच्या सूचना होत्या. त्याप्रमाणे झालेल्या संमेलन स्थळांची यादी देण्यात येईल. नव विवाहित दाम्पत्यांनी प्रतिष्ठानकडे आगाऊ सूचना दिल्यास, कळविल्यास त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यास सहज शक्य आहे. श्रीमती प्रतिभाताई भिडे ह्यांनी संमेलनामध्ये तरुणांचा सहभाग अधिक वृद्धिंगत होण्यासाठी तरुण भिडे कुलोत्पन्नांना वेगळे पत्र पाठविण्याबाबत जरुर प्रयत्न होईल त्यासाठी तरुणांनी अथवा घरातील मंडळींनी त्यांचे नाव/पत्ता व संपर्क क्रमांक पत्राने अथवा एस्.एम्.एस्. करून कळवावा.

डोंबिवली संमेलनात खुल्या चर्चेच्यावेळी पुढील संमेलनस्थळाकरिता ॲड. अविनाश भिडे, सौ. संगिताताई भिडे, श्री. माधव नारायण भिडे आणि श्री. चैतन्य भिडे ह्या सर्व नाशिकमधील स्थानिक मंडळींनी संमेलन नाशिकमध्ये घेण्यासाठी आम्ही भिडे एकत्र होऊन यशस्वी करू ह्या विचाराने आपले मनोगत प्रकट केले ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. खरंतरं ह्या चर्चेच्यावेळी गोवा, इंदोर व नाशिक अशी स्थळे विचाराधीन होती. परंतु गोवा, इंदोरची उपस्थिती कमी असल्यामुळे नाशिक हे स्थळ बहुतांशी नक्की केले आहे. प्रतिष्ठानला बळ देणाऱ्या वरील स्थानिक (नाशिक) मंडळींव्यतिरिक्त सुद्धा नाशिकमधील इतर इच्छुक भिडे बंधु/भगिनींनी/माहेरवाशीणींनी सुद्धा संमेलनाचे आयोजनात सक्रीय व्हावे अशी विनंती करतो. संमेलन म्हणजे एकट्या दुकट्याचे काम नसून हे सांघिक कार्य आहे. आपले संमेलन यशस्वी होण्याकरिता प्रतिष्ठानची कार्यकारिणी, विश्वस्त आपणांस मदतीचा हात देण्यास सदैव कटीबद्ध आहेत.

दिलीप वासुदेव भिडे, पुणे
मो. - ९६५७५४१२३६

---

## 'महागाई'

पूर्वी बेशद्ध पडल्यावर
प्रथमोपचार म्हणून
कांदा फोडायचे
आता फक्त यादी
हातात घेऊन भाव वाचायचे
अहो ! बेशुद्धच काय
तिरडीवरचाही उठेल
या महागाईमुळे
मी मेलो कसा
भाव वाचल्यावर
उठून बसलो कसा
यावर भाष्यही ठोकेल !

विजय अनंत भिडे, ठाणे
९८३३०४५४६३

---

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

# भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## एप्रिल

१) श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा १
२) सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे १
३) श्री. महेश मधुसुदन भिडे, अलिबाग २
४) सौ. पूर्वा प्रमोद देवधर, दादर २
५) श्री. श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण २
६) कु. भूषण राजाराम भिडे, अलिबाग १५
७) श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली १७
८) श्री. संजय शंकर भिडे, मुंबई १७
९) श्री. संतोष वसंत भिडे, ठाणे १८
१०) श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे २०
११) सौ. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा २३
१२) श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे २४
१३) चि. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी २४
१४) सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे २५
१५) श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे २६
१६) श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली २७
१७) कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली २८
१८) कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली २८
१९) सौ. किर्ती प्रशांत भिडे, पुणे २८

## मे

१) श्री. अरविंद नरहरी भिडे, पुणे ३
२) सौ. वृषाली विठ्ठल भिडे, डोंबिवली ३
३) सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे ५
४) श्री. शरद हरी भिडे, पुणे ११
५) श्री. राजेश शरद भिडे, पुणे ११
६) कु. मैत्रीयी सुहास भिडे, पुणे १३
७) सौ. पूनम अमित भिडे, पुणे १३
८) श्री. विश्वनाथ शंकर भिडे, बदलापूर १३
९) श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे १७
१०) सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल १९
११) श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे २२
१२) कु. सदीच्छा सतिष भिडे, मुंबई २३
१३) कु. ओम चंदन भिडे, पुणे २४
१४) सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली २५
१५) श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे २६
१६) कु. रीचा विक्रम भिडे, हैदराबाद २६
१७) सौ. मंगला प्रदीप भिडे, भांडूप २७
१८) कु. अपूर्व राजेन्द्र भिडे, डोंबिवली २७
१९) श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगांव २९
२०) सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे २९
२१) श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे २९
२२) श्री. विनय कुमार भिडे, बेंगलोर २९

## जून

१) सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे १
२) सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे १
३) कु. अमृता चंदन भिडे, पुणे ५
४) सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे ६
५) सौ. स्मिता विजय भिडे, ठाणे ८
६) कमल बाळकृष्ण देवधर, गिरगांव १४
७) कु. अश्वीनी विजय भिडे, ठाणे १९
८) श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव २०
९) सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे २०
१०) सौ. सुनीती विवेक भागवत, नाशिक २१
११) सौ. मोहीनी अविनाश भिडे, पुणे २३
१२) श्री. प्रतिक संतोष भिडे, ठाणे २६
१३) श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल २९
१४) सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर २९


## भिड्यांनी भिड्यांसाठी सुरू केलेल्या 'दी अपूर्व ग्रुप टूर्स'चा श्री गणेशा

पर्यटनासाठी, पर्यटकांसाठी स्नेहाची
ना नफा, ना तोटा या तत्वावर किफायतशीर सहल

- मैत्रीपूर्ण सहवास
- शाकाहारी भोजन व निवास व्यवस्था
- रेल्वे व बसचा प्रवास
- जास्तीत जास्त प्रेक्षणीय स्थळे

**डिसेंबर २०१४/जानेवारी २०१५**
**मध्ये मध्यप्रदेश,**
**गुजरात व कोकणदर्शन**

- संपर्क -
सौ. वर्षा दिलीप भिडे,
मो. : ९७६३०७९१३१ किंवा ९६५७५४१२३६


## सहवेदना

भिडे कुलातील ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे निधन झाले त्यांना
भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.
ईश्वर त्यांना चिरशांती देवो ही प्रार्थना !
१) श्रीमती विजया हरि देवधर, पुणे

## नम्र सूचना

ज्या कुलबंधु/भगिनींना/माहेरवाशिणींना आम्ही भिडेचा अंक मिळत नाही अथवा प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर कळवावा. तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरीत कळवावे.

दिलीप भिडे, पुणे - ९६५७५४१२३६,
ले.क.सुनील भिडे, पुणे - ९६२३०१७४४४,
अजय भिडे, मुंबई - ९९६९५४४७२४,
प्रदीप भिडे, डोंबिवली - ९८९२५०४०४२

# ७० वर्षांपूर्वीचे पुणे

श्री. केशव मो. भिडे, पुणे
मो. - ९८८१२०१९३०

आम्ही पिढीजात पुणेकर ! आणि ते सुद्धा सदाशिव पेठी ! आमचे पणजोबा विनायक रावजी भिडे हे इंग्रजांनी विश्रामबाग वाड्यात सुरू केलेल्या इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापक ! त्यांनी १८९० चे सुमारास मौजे मुंजेरी, काळे वावर येथे चौसोपीवाडा बांधला. हा वाडा तुळशीबाग भाऊ महाराजांचा बोळाकडून चिंचेच्या तालमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बदामी हौद चौकानजिक येतो. शहराच्या अगदी मध्यवर्ती असलेले ते ठिकाण त्यावेळी शहराच्या वेशीजवळ होते.

वाडा जूना झाल्याने २०११ मध्ये आम्ही तो विकसनाकरिता दिला. आमच्या ५ पिढ्या या वाड्यात रहात होत्या. माझा जन्म १९३४ मधील. मला ६ वर्षांपासून आठवते. वयाची ६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर १९४० मध्ये आमच्या घराजवळ भाऊ महाराज बोळाच्या तोंडाजवळ असलेल्या पंडीतांच्या वाड्यामध्ये सरस्वती मंदीर प्राथमिक शाळेमध्ये बिगारीच्या वर्गात माझे नाव घालण्यात आले. त्यावेळी बिगार, पहिली, दुसरी, तिसरी, चौथी असे प्राथमिक शाळेतील पाच वर्ग असत. बिगार म्हणजे सध्याची मॉटसिरी. ६ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय शाळेत प्रवेश नसे. सरस्वती मंदीर प्राथमिक शाळेचे ३ री व ४ थी चे काही वर्ग तुळशीबागवाले यांच्या वाड्यामध्ये भरत. माझा ४ थी चा वर्ग तुळशीबागेवर होता. त्यावेळची आठवण म्हणजे मधल्या सुट्टीत एक म्हातारी पांढरी स्वच्छ गाय होती. लोक तिला नमस्कार करीत. ती मेली त्यावेळेस लोकांनी तिची मिरवणूक काढली. आम्हाला त्यादिवशी अर्धा दिवस सुट्टी मिळाली. आमचे घरापासून मंडई केवळ ५-७ मिनिटांच्या अंतरावर ! आता ज्याला महात्मा फुले मंडई म्हणतात. त्याला त्यावेळेस रे मार्केट म्हणत. लोकमान्य टिळकांचे पुतळ्याचे मागे जी ८ पाकळ्यांची सुंदर दगडी इमारत दिसते. तेवढीच मंडई त्यावेळेस होती. या ८ पाकळ्या म्हणजे ८ विभाग. प्रत्येक भागात भाजी, फळे इ. विभागली असत. घाऊक व किरकोळ भाजी, फळे इ. सर्व याच दगडी इमारतींमध्ये विखुरलेले होते. या इमारतीच्या मध्यभागी गोलाकार भागात विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचा पुतळा होता. या गोलाकार भागात वाण्याची दुकाने होती. आतल्या भागात एका बाजूला मोठा जीना होता. तेथून वर गेल्यावर निरनिराळ्या वस्तूंचे मोठे प्रदर्शन होते. आता हे प्रदर्शन घोले रोडवर महात्मा फुले वस्तू संग्रहालय येथे हलवले आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकरांचा पुतळा न्यू इंग्लीश स्कूल, टिळक रोड येथे इमारती बाहेर बसविला आहे.

दगडी मंडई इमारतीसमोर मोकळे मैदान होते. जेथे सध्या मंडईच्या गणपतीचे मंदीर आहे. तेथे पाण्याचे हौद होते. बाकीच्या मोकळया जागेत बैलगाड्यांचा तळ होता. बाहेरच्या गावातून शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला भाजीपाला घाऊक विक्रीदार (दलाल) यांचेसाठी आणला जाई. (आता हा सर्व घाऊक माल मार्केटयार्ड येथे हलवला आहे. मोकळ्या मैदानात त्यावेळेस राजकीय पुढाऱ्यांची भाषणे होत असत. ४४-४५ च्या सुमारास म्हणजे १०-११ वर्षी मी घरातील लोकांबरोबर भाषण ऐकावयास गेल्याचे आठवते. ज्याला मंडई विद्यापीठ असे रूढार्थाने म्हणत ते खरोखरी पुण्याचे चालते बोलते विद्यापीठ होते. पुणेकर येथे नियमाने मंडईत भेटत. चर्चा चाले. मंडई परिसरात पहाटेपासून वर्दळ असे. तेथे ओळीने ४-५ हॉटेल्स होती. मिनर्व्हा, आर्यन व जवळच ग्लोब टॉकीज अशी तीन सिनेमा थिएटर्स होती. आर्यन टॉकीजला दर रविवारी सकाळी १० ला एक आण्यात इंग्रजी सिनेमा दाखवला जाई. आता मिनर्व्हा व आर्यन ही दोन्ही थिएटर्स पाडून तेथे वाहनतळ झाले आहेत. ग्लोबचे नावे आता श्रीनाथ टॉकीज आहे. टिळक पुतळ्यामागे दगडी मंडईच्या पहिल्या पाकळीत एका मोठ्या चौकोनी जागेत सुट्या नाण्यांची चळत मांडून एक गृहस्थ मोड देण्यासाठी बसे. त्यावेळेस १६ आण्यांचा एक रुपया असे चलन प्रमाण होते. १ रुपया, ८ आणे व ४ आण्यांची नाणी चांदीची होती. १ पैसा तांब्याचा, २ पैशांच्या ढब्बूचे नाणे, ४ पैशांच्या १ आण्याचे तसेच २ आण्यांचे कथलाचे नाणे होते. पावशेर, अर्धाशेर, एक शेर अशी धान्य मोजण्याची मापे होती. ४ शेराची पायली ! कधी कधी आई मंडई आणण्यासाठी ४ आणे देई. त्यावेळेस १ आणा शेर कांदे, २ आणे शेर बटाटे. भाजी पाल्याची जूडी २ पैसे असे भाव असत.

आमचे घरापासून चिंचेच्या तालमीकडे रस्ता जातो. त्याच्याशेवटी वाडिया हॉस्पिटल होते. तेथे जूने पुणे संपे. आमचे घराजवळ काळा हौद होता. त्याचे समोर नातूंचा मोठा वाडा होता. तो ४२ चे सुमारास जळाला. तो ८ दिवस जळत होता. आता त्याला नातूबाग म्हणतात. तो संपूर्ण नातूंचा वाडा व मागे त्यांची बाग होती. या संपूर्ण परिसराला विटांच्या भिंतीने वेढले होते. जेथे सध्या बाजीराव रोड येथील टेलिफोन एक्सचेंज आहे. तेथे मैदान होते. अर्थात त्यावेळेस बाजीराव रोड नव्हता. त्या रस्त्याची सुरवात नवा विष्णू मंदीरापासून सुरू होई. नवा विष्णू मंदीर चौक ते शिवाजी नगर रेल्वे स्टेशन असा मुख्य रस्ता होता. या रस्त्याच्या शनीपार चौकाजवळ जेथे विश्रामबाग वाडा आहे तेथे पूर्वी पुणे म्युन्सिपालटीचे ऑफिस होते. (म्युन्सिपालटीचे पुढे कॉर्पोरेशन झाले) या विश्रामबाग वाड्यासमोर जेथे सध्या बँक ऑफ महाराष्ट्रची इमारत आहे तेथे पूर्वी मोठा वाडा होता. नगरकर तालीम ही रस्त्याच्या कडेला होती. रस्त्यावरून तालीम दिसे. लक्ष्मीरोड चौकातून पुढे गेले म्हणजे डाव्या हाताला हूजूरपागेच्या शाळेची इमारत होती. त्याचे मुख्य प्रवेशद्वार तेथे होते. (जे आता लक्ष्मीरोडला आहे) चौकाच्या उजव्या हाताला दोन हॉटेल्स होती. एक समाधान व दुसरे संतोष. मुलांनी हॉटेल्समध्ये जाणे हे निषिद्ध मानले जाई. कुटुंब घेऊन हॉटेलमध्ये जाणे हे कमीपणाचे लक्षण मानले जाई. अप्पा बळवंत चौकाचे पुढे उजव्या हाताला प्रभात टॉकीज (जे पूर्वी किबेवाडा होता.) सोडली तर दुतर्फा शनवारवाड्यापर्यंत बहुतेक पेशव्यांच्या सरदारांचे वाडे होते. (मेंहेदळे, मोरोबाबा, दादा फडणवीस, रास्ते, बावडेकर इ.) शनवार वाड्यासमोरच्या मैदानात जूना बाजार भरत असे. नवापूल

(पान १० वर पहा.)

# दानाशिवाय देवालय

सौ. वर्षा दिलीप भिडे, ९७६३०७९१३१ (पुणे)

आजकाल पैशाशिवाय काहीही मिळत नाही. अगदी देवदर्शनासाठीसुद्धा पैसे द्यावे लागतात. परंतु उत्तरांचल राज्यातील एका शंकराच्या मंदीरात मात्र देवाला पैसे वाहण्यास अथवा कोणतेही दान देण्यास सक्त मनाई आहे हे वाचून आश्चर्य वाटले. परंतु हे वास्तव आहे. आणि अशाप्रकारच्या पाट्या मंदीरात अथवा मंदीराबाहेरसुद्धा लावलेल्या आहेत. हे मंदीर डेहराडूनहून मथूरेस जाताना रस्त्यावरच ''प्रकाशेश्वर महादेव मंदीर'' ह्या नावाने स्थित आहे. हे मंदीर खत्री नावाच्या कुटुंबीयांच्या खाजगी मालकीचे आहे. मसुरीला जाणारे पर्यटक आवर्जून थांबून दर्शन घेतात.

मंदीरामध्ये शंकराची पिंड आहे. ह्या पिंडीचे दर्शन घेण्याअगोदर डाव्याबाजूला दोन स्फटीकांची शिवलिंगे आहेत. त्या स्फटीकांच्या शिवलिंगाना हात लावून त्याच्या शितलतेची खात्री करून घेता येते. तेथेच खत्री कुटुंबियांचे ग्रहांचे खडे, मोती, श्रीयंत्र, स्फटिकाची लिंगे, मोत्यांच्या माळा, अमेरिकन डायमंडस् इत्यादी आकर्षक वस्तू मिळण्याचे दुकान आहे. वेगवेगळ्या ग्रहांचे खडे मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण आहे असे सांगितले जाते. ग्राहकांसाठी वैशिष्ट्य म्हणजे हे ग्रहांचे खडे नकली आहेत असे पुराव्यासह दाखवून दिल्यास ५ लाख रुपये रोख इनाम देण्याची पाटीसुद्धा झळकतांना दिसते. दुकानाबाबत काही चौकशी व तक्रार असल्यास काऊंटर नं. ४ वर भेटावे. सेल्समनशी वाद घालू नये अशा अनेक पाट्या बघण्यास मिळतात. सकाळी आरती झाल्यावर द्रोणामध्ये वेगवेगळ्या प्रकारचा प्रसाद दिवसभर देण्यात येतो व त्याचबरोबर वाफाळलेला चहासुद्धा दिला जातो. मसुरीसारख्या थंडवातावरणात त्यावेळी चहा म्हणजे पर्वणीच ठरते.

मंदीरामध्ये पैसे वा दान न घेण्याचे कारण म्हणजे परमेश्वरच आपल्याला देत असतो तर त्या देवालाच आपण पुन्हा दान परत करायचे नाही म्हणून भाविकांकडून कोणतेही दान घेतले जात नसेल असे वाटते. सध्याच्या ह्या व्यापारी आणि व्यवहारी जगात कोणत्याही मदतीशिवाय एखादे देवस्थान चालवून निस्वार्थीपणे भक्तांची सेवा करणे म्हणजे एक आश्चर्याचाच भाग आहे म्हणून प्रत्येक शिवभक्ताने ही शंकराची भेट चुकवू नये असे वाटते.

### दिलगीरी

'आम्ही भिडे' मुखपत्र क्र. 18 मध्ये विद्यार्थी गुणगौरव ह्या सदरातील गट क्र. 9 मध्ये 10 वी शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता पुरस्कृत असलेल्या नावामध्ये भिड्यांची माहेरवाशीण सौ. स्नेहा रमेश आपटे पुरस्कृत त्यांचे वडील कै. दत्तात्रय विनायक भिडे यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक देण्यात आले असे वाचावे. अंकात झालेल्या चुकीबद्दल क्षमस्व !

- कार्यकारी संपादक

# आपले सरकार आहे खरे कलाकार

रस्त्यांना खड्डे करून करतात कलाकुसर
त्यावर डांबर टाकून देतात थरावर थर
इतके सुंदर 'पॅचवर्क' मग होते तयार ॥ १ ॥ आपले ....
कुठे फरशा, कुठे डांबर, कुठे खडी
वाहने चालवावी लागतात नागमोडी
मग प्रत्येकाला मिळतो 'मोटोक्रॉस' चा थरार ॥ २ ॥ आपले ....
खड्यातल्या पाण्याने कपड्यावर नक्षी
आजूबाजूचे सर्वच होतात फजितीचे साक्षी
चिखलाच्या खडीचे 'पेंटिंग' नक्षीदार ॥ ३ ॥ आपले ....
नदीच्या कडेने कचऱ्याची सजावट
इतका सुंदर कचरा पण पेटीत नाही मावत
'कचऱ्यातून कला' यांनाच जमते सुंदर ॥ ४ ॥ आपले ....
कुठे बँड, कुठे मिरवणूक, तर कुठे कर्णे
कुठे हॉर्न, वाहनांचे आवाज गप्पपणे ऐकणे
सरकारला 'संगीताची' आवडच फार ॥ ५ ॥ आपले ....
रस्त्याच्या कडेने लावलेले फलक
त्यावर भावी नेत्यांची दिसते झलक
'फोटोग्राफी' नमुने मग होतात तयार ॥ ६ ॥ आपले ....
इतक्या चांगल्या सरकारला आपण का ठेवतो नावे ?
त्यांचे रंग ढंग नी कला याबाबत काय बोलावे ?
आपण इतके नाही बाबा हुशार ॥ ७ ॥ आपले ....

# भ्रमंती

कुठली माती कसली नाती
सारे आपुलेच गीत गाती
कितीही असोत हात हाती
काल प्रवाही ते निसटती
दिवस रात्र जाती येती
पाखरे नवे इमले बांधती
नवी घरटी नवे संगती
चार दिसांनी उडुन जाती
कशास चिंता का आठवती
दोन क्षणांचे सारे सोबती
कुणास ठाऊक कुठे निवारा
कुठे नेई हा प्रवास सारा
तरी चालणे नच विरामा
पुन्हा खेळ अन पुन्हा भ्रमंती

- *सौ. प्रीती भिडे, पुणे*

*फोन : ०२०-२४२०३१६३, ९९२२९४४०८२*

# आपलं कुल संमेलन

नित्युंदन ऋषींचे स्मरण करून
योगेश्वरी देवीला वंदन करून
चार जानेवारीच्या दुपारच्या प्रहराला
सुरूवात झाली भिडे कुलसंमेनाला ॥१॥

दीप प्रज्वलन झाले प्रदिप भिड्यांच्या हस्ते
तिथे माधव भिडे अध्यक्ष होते
औपचारिक उद्घाटन झाले होते
आता प्रतिष्ठान कार्याविषयी बोलायचे होते ॥२॥

प्रदिप भिड्यांचे सुंदर विचार ऐकायला
माधव भिड्यांचे अनुभवी बोल श्रवणाला
संमेलन उद्घाटन सोहळा पहायला
शेकडो भिडे आले उपस्थिती लावायला ॥३॥

परस्पर परिचयानंतर भिड्यांच्याच अमोलने
प्रेक्षकांना चकित केले जादूच्या प्रयोगाने
जपानस्थित अमोलच्या बुद्धी चातुर्याने
वाहवा केली डोबिंवलीच्या शगुन हॉलने ॥४॥

पाच जानेवारीच्या प्रसन्न सकाळी
चहा-नाष्ट्याचा आस्वाद घेऊन मंडळी
पुन्हा शगुनमध्ये दाखल झाली
पुढच्या कार्यक्रमाची सूचना मिळाली ॥५॥

सुधीर जोगळेकर पाहुणे लाभले
'आम्ही भिडे' अंकाचे प्रकाशन झाले
भिडे परिवाराने टाळ्यांच्या गजरात
१८ व्या अंकाचे स्वागत केले ॥६॥

अध्यक्षांच्या, पाहुण्यांच्या मनोगतानंतर
विद्यार्थी गुणगौरव, जेष्ठांचा सत्कार,
वितरित केले प्रतिष्ठानचे पुरस्कार
कार्यक्रमाला आली वेगळीच बहार ॥७॥

भिड्यांच्या पाच महिला, प्रतिनिधी म्हणून निवडल्या
कार्यक्रमाच्या निमित्ताने स्टेजवर जाऊन बसल्या
या सन्मानाने समस्त भगिनी आनंदल्या
माहेरवाशीणी, सासुरवाशीणी, शुभेच्छा देऊ-घेऊ लागल्या ॥८॥

खुपच बक्षिसे जाहीर झाली होती
बऱ्याच विद्यार्थ्यांची अनुपस्थिती होती
मान्यवरांनी खंत व्यक्त केली
तरूणांची संख्या कमी जाणवली ॥९॥

कार्यक्रमाला वझे, साने येऊन गेले
बरचं मोलाचं बोलून गेले
तुमच्यात आमचं काय काम म्हणत
सगळे एकारांती एक झाले ॥१०॥

श्री ओंकार दातार व सहकाऱ्यांचा
कार्यक्रम होता सुंदर गाण्यांचा
उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला श्रोत्यांचा
यानंतर कार्यक्रम होता भोजनाचा ॥११॥

बेत केला तूप-पुरणपोळीचा
ताट भरून पदार्थ थाट पेशवाईचा
याला हातभार कानिटकर केटरर्सचा
भोजनानंतर टाईम झाला खुल्या चर्चेचा ॥१२॥

चर्चेत दिलीपकाका आणि कर्नल भिड्यांनी
सर्वांना समर्पक उत्तरे दिली
आभार प्रदर्शन आणि चहा-पानांने
संमेलनाची सांगता झाली ॥१३॥

नियोजन, सूत्रसंचालन उत्तम होतं
याच श्रेय डोंबिवलीकरांना जावं
पाहुया पुढचं संमेलन कुठं ठरतं
आमच्याकडे घ्या नाशिककरांचे म्हणणं होतं ॥१४॥

गजानन रामचंद्र भिडे, बारामती
मो. - ९०११८४०८७६


## 'आम्ही भिडे' जाहिरात पत्रक

१) त्रैमासिक/वार्षिक पूर्ण पान साधे (B/W) ----- रु. २,०००/-
२) त्रैमासिक/वार्षिक अर्धे पान साधे (B/W) ----- रु.१,०००/-
३) त्रैमासिक/वार्षिक पाव पान साधे (B/W) ------- रु.५००/-
४) त्रैमासिक/वार्षिक शुभेच्छा पट्टी (B/W) ------- रु.५००/-
५) वार्षिक अंक प्रायोजकत्व --------------- रु. ३५,०००/-
६) त्रैमासिक अंक प्रायोजकत्व --------------- रु. ८,०००/-

# ''गोंदवल्याचे कैवल्य''

कै. हरीभाऊ भिडे सांगली ह्यांनी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांवर लेखमाला लिहीली आहे. त्यांचे चिरंजीव श्री. मिलींद ह्यांनी ही लेखमाला 'आम्ही भिडे' अंकात प्रसिद्ध करण्यासाठी आपल्याकडे सुपूर्द केली आहे. आम्ही भिडे च्या प्रत्येक अंकामध्ये शक्य असेल त्याप्रमाणे हे लेख प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. कै. हरीभाऊ नुकतेच अनंतात विलीन झाले असले तरी लेखमालेच्या रूपाने आपण पुन्हा त्यांना पाहू या.

---

**जयाचा जनी जन्म नामांत झाला ।**
**जयाने सदा वास नामांत केला।**
**जयाचे मुखी सर्वदा नाम किर्ती ।**
**नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य मुर्ती ॥**

ज्या विभूतीचा जन्मच नामात झाला त्यांचे मुखी सर्वदा नामस्मरण चालू असल्यामुळे त्यांचे वास्तव्य नामातच होते. ती विभूती म्हणजे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज होत ! नासिकला जसे मुक्तीधाम आहे. त्याचप्रमाणे महाराजांचे समाधी मंदिर म्हणजे एक कैवल्य धामच आहे. त्या विषयी थोडे चिंतन करणेचे आहे.

महाराजांचा जन्म गोंदवले येथे श्री रावजी व सौ. गीतादेवी यांचे पोटी सन १८४५ मध्ये माघ शु. द्वादशीला सूर्योदयाचेवेळी झाला. त्याचे नांव गणपती असे ठेवले. श्री. लींगोपंत त्याचे (महाराजांचे) आजोबा त्याला गणपती म्हणत. आई वडील गणू असे म्हणत. पण गोंदवल्यात ते गणूबाबा म्हणून ओळखले जात. ते समर्थ रामदासांचे अंशात्मक अवतार आहेत. सर्वांना हवाहवासा वाटणारा हा बाळ सर्वांचा लाडका झाला. रावजींनी त्यांना गुरूजींचेकडून सर्व प्रकारचे शिक्षण दिले. महाराज हे एकपाठी होते. त्यांनी सद्‌गुरूकडून उपदेश प्राप्त करून घेण्याचे ठरविले. एक दिवस ते गुरूशोधार्थ घराबाहेर पडले. त्यांचे गुरु तुकामाई हे येहळगावी आहेत असे एका शास्त्रीकडून त्यांना कळले. महाराजांनी कोणताही विचार न करता येहळगावी गुरू भेटीस आले. गुरूमाऊली त्यांची वाटच बघत होते. त्यांनी महाराजांच्या सर्व परीक्षा घेतल्या. त्यात ते पूर्ण यशस्वी झाले. गुरुमाऊलींनी त्यांना गुरूपोदेश दिला. त्यांनी त्यांना 'श्रीराम जय राम जय जय राम'' असा महामंत्र दिला.

पुढे महाराजांनी नैमिष्यारण्यात साधना केली. नंतर तीर्थयात्रा संपवून ते गुरू आज्ञेप्रमाणे गोंदवलेस आले. गोंदवलेस खातवळचे कुलकर्णी यांचे मुलीशी त्यांचा विवाह संपन्न झाला. उभयतांनी सद्‌गुरु तुकामाई यांची भेट घेतली. त्यांची पत्नी सौ. सरस्वती यांनी पुत्र प्राप्तीची मागणी केली. पण तो पुत्र अल्पायुषी होता. पुढे त्यांची पत्नी व मुलगा मयत होतात. पुढे त्यांचा द्वितीय विवाह आटपाडीचे सखाराम देशपांडे यांची अंध मुलगी यमुना हिचे बरोबर होतो. महाराजांची संसारात आसक्ती नव्हतीच. त्यांचे आईचे आग्रहासाठी त्यांनी लग्नास अनुमती दिली होती. श्री रावजींचे पश्चात गीताताई फार थकल्या होत्या. काशीयात्रा करणेची त्यांची इच्छा महाराजांनी पूर्ण केली. त्यांचे हाती काशीचे ब्राह्मणांना दान करविले. नंतर ती दोघे अयोध्येस आले. तेथे श्रीरामांचे दर्शन घेतले. शरयु नदीचे तीरावरच महाराजांचे मांडीवर त्यांनी प्राण सोडले.

कलीयुगात नाथभक्ती श्रेष्ठ आहे. तीच सोपी भक्ती आहे. त्यामुळे साधकांना आत्मस्वरूप ज्ञान प्राप्त होते. त्यांनी सर्वांना 'श्रीराम जय राम जय जय राम' हा तारक मंत्र दिला. महाराजांनी सन १९१३ मध्ये मार्गशीर्ष वद्य दशमीस पहाटेस गोंदवल्यास देह ठेवला.

समाधी मंदिर

श्री गोंदवलेकर महाराज हे चोवीस तास नामातच असायचे. त्यांचा जन्म नामातच झाला होता. ते म्हणत 'जेथे नाम तेथे माझे प्राणच आहेत.' त्यांची नामभक्तीविषयी ३६५ प्रवचने प्रसिद्ध आहेत. रोज एक प्रवचन याप्रमाणे भक्तांना अध्यात्म साधना करता येते. गोंदवलेस त्यांनी नामाची पेठच उघडली होती. त्यांचे जीवन तीन गोष्टीत विभागले होते. १) गोरक्षण २) अन्नदान ३) नामस्मरण. अन्नदानापेक्षा ज्ञानदान श्रेष्ठ आहे कारण ते शाश्वत आहे. त्यामुळे जीवनात माणसांना प्रगती करता येते. ते भक्तांना म्हणत, ''तुम्ही गोंदवल्यास या. नामस्मरण करा. रामाचा प्रसाद घ्या व मनःशांती मिळवा. प्रपंचात माणसाचे मन दुःचित्त होते व तो समाधानास पारखा होतो. त्याचेवर नामस्मरण हेच साधन आहे. माणसाने संसारातून आसक्ती, अहंपणा व लोभ सोडला पाहिजे. त्याचे जीवन सुखी होईल. त्यांनी लाखो लोकांना नामंत्र दिला. महाराज आपल्या गुरू सुबोध या पद्यात म्हणतात,

**''दाता राम सुखाचा, संसारा मान तूं प्रभू सेवा**
**हाचि सुबोध गुरूचा, संतोषा सर्वदा मनि ठेवा''**

ते म्हणत परमार्थासाठी प्रपंच सोडण्याची जरुरी नाही. फक्त प्रपंचातील आसक्ती कमी केली पाहिजे. नेकीचा संसार ही सुद्धा एक प्रभू सेवा आहे !

रामपाठात ते श्री प्रभू रामचंद्रांकडे काय मागणे मागतात ते पाहू

**मी न मागे धन संपत्ती ।**
**मज न लगे वैकुंठप्राप्ती ।**
**परि तुझ्या भक्तांची संगती ।**
**मज घडो सर्वदा ॥**
**कोट्यानुकोटी जन्म घेईन ।**
**करीन तुझे पाद सेवन ।**
**अवतार लीळा मुखाने गाईन ।**
**ऐसे मज देई सर्वदा ॥**

**ही गुरू स्मृती सेवा त्यांचे चरणी अर्पण.**

**श्री. मिलींद भिडे, सांगली**
**मो. ९४२११२३००३**

## विवाह सुवर्णोत्सव

### नाबाद - ५०



मी भिड्यांची माहेरवाशीण कु. रजनी रामचंद्र भिडे. वडीलांना वालचंदनगरमध्ये शेतकी खात्यात नोकरी. पगार बेताचाच, त्यात आम्ही पाच भावंडे, माझ्या पाठची तीन भावंडे असल्यामुळे २८ फेब्रुवारी ६३ ला माझा विवाह श्री. मोरेश्वर वासुदेव करंदीकर यांचेशी झाला. तो सुद्धा कोणत्याही हुंड्याच्या अटीशिवाय. आम्ही फक्त २५०० रुपयांत. परंतु त्यावेळी हा खर्च सुद्धा माझ्या वडीलांना डोंगराएवढा होता. लग्नानंतर सासु-सासऱ्यांचा सहवास फार काळ लाभला नाही. माझ्या पतीची नोकरी एरिगेशन खात्यात फिरतीची नोकरी असल्यामुळे अनेक गैरसोयीतसुद्धा आमचा संसार आनंदात होता. राहुरीजवळ मुसळवाडीत असतांना ऑफिसकडून क्वार्टर मिळाली. वसाहत छोटी होती परंतु चोरट्यांचा वावर खूप असायचा. त्यामुळे ३ मुलांना घेऊन थोडेफार असलेला पैसा अडका घेऊन आम्ही कित्येक रात्री इरिगेशनच्या ऑफिसमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव झोपायला जात असू. पण मुलांना चांगल शिकवायच आणि सुसंस्कारीत करायचा ध्यास असल्यामुळे सर्वकाही सोसण्याची तयारी होती.

आमचा ५० वा वाढदिवस मागीलवर्षी सुनांनी व मुलांनी साजरा केला. भाऊ गजाननने कविता केली. दुसरा भाऊ पुरुषोत्तम ह्याने पेटी वाजवून गाणी म्हटली, मनोरंजनात्मक असा कार्यक्रम झाला. भिडे प्रतिष्ठानच्या 'आम्ही भिडे' मुखपत्रात विवाह सुवर्णोत्सव सदरामध्ये माझ्यासारख्या माहेरवाशीणीचे कौतुक करीत आहात त्यामुळे लग्नाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा आनंद द्विगुणीत झाला आहे. समस्त भिडे परिवारास आम्हा उभयतांतर्फे धन्यवाद व हार्दिक शुभेच्छा !

~~~

---

**✱ 'सूर्य शिबीर'चे संचालक श्री. मिलींद भिडे यांनी दरवर्षीप्रमाणे डोंबिवली कुलसंमेलनात बॅनर देऊन देणगी स्वरूपात मदत केली त्याबद्दल आभारी आहोत.**

## योगेश्वरी व व्याडेश्वर दर्शन

आपल्या सर्वांची कुलदैवता श्री योगेश्वरी (अंबेजोगाई) आणि कुलदैवत श्री व्याडेश्वर (गुहागर) अशा दोन्ही देवतांची प्राण प्रतिष्ठापना एकाच ठिकाणी श्री. गोगटे कुटुंबियांनी कर्जतपासून ६ ते १० कि.मी. अंतरावर केली आहे. काही जणांना अंबेजोगाई व गुहागर येथे जाऊन देवदर्शन घेणे जमत नसल्यास त्यांनी वरील ठिकाणी जाऊन देवदर्शनाचा लाभ घेता येईल. मी स्वतः ह्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन आलो आहे. रम्य असा परिसर आहे. गाव तसे खेडेगावच आहे. तेथे गोगटे बंधूचे अनेक प्रकल्प उभे राहात आहेत.

संपर्कासाठी पत्ता

श्री. अनिल दत्तात्रय गोगटे - ९२७१६१८१८४

श्री. विनायक दत्तात्रय गोगटे - ९२७१६१८१८५

श्री. अभय दत्तात्रय गोगटे - ९२७१६१८१८६

कोंढाणे-कर्जत

श्री. दिगंबर शिवराम गोगटे - ९८२३९३२०५४

पुणे

प्रभाकर लक्ष्मण भिडे, पुणे

---

### जानेवारी २०१४ ते मार्च २०१४ पर्यंतचे देणगीदार

| | |
|---|---|
| १) श्री. वसंत विष्णू भिडे, सांगली | रु. ५०,००१/- देणगी |
| २) श्री. माधव चिंतामणी भिडे, माहिम | रु. ५०,०००/- देणगी |
| ३) श्री. शशीकुमार केशव भिडे, पुणे | रु. १००००/- देणगी |
| ४) श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली | रु. ५०००/- देणगी |
| ५) श्री. रामचंद्र महादेव भिडे, पुणे | रु. ५०००/- साहस पु. देणगी |
| ६) सौ. वनिता नरसिंह भिडे, पुणे | रु. ५००/- देणगी |
| ७) सौ. अंजली हेमंत कुलकर्णी, मालाड | रु. १०००/- देणगी |
| ८) श्री. सुरेश सदाशिव भिडे, निगडी | रु. १०००/- देणगी |
| ९) श्री. विजया भिडे, भांडूप | रु. १०००/- देणगी |
| १०) श्री. माधव नारायण भिडे, नाशिक | रु. १०००/- देणगी |
| ११) सौ. प्रतिभा प्रभाकर गद्रे, डोंबिवली | रु. २०००/- देणगी |
| १२) श्री. देवेन्द्र रविंद्र भिडे, कल्याण | रु. १०००/- देणगी |
| १३) सौ. स्मिता कमलाकर आपटे, नवीन पनवेल | रु. २५०/- देणगी |
| १४) श्रीमती शांता भिडे, गोरेगाव, मुंबई | रु. १०००/- देणगी |
| १५) श्री. भालचंद्र रावजी भिडे, मुरबाड | रु. २५०/- देणगी |
| १६) सौ. माधुरी भिडे, डोंबिवली | रु. १०००/- देणगी |
| १७) श्री. गोपाळ कृष्ण भिडे, कल्याण | रु. १००५/- देणगी |
| १८) श्री. नारायण भिडे, डोंबिवली | रु. ५००/- देणगी |
| १९) श्री. शाम श्रीपाद भिडे, सांगली | रु. ६००/- देणगी |
| २०) श्री. प्रमोद गोविंद भिडे, दादर | रु. ९०० आजीव सभासद |
| २१) श्री. विद्याधर भिडे, पुणे | रु. ९००/- आजीव सभासद |
~~~

(पान ५ वरून)

ओलांडला की पुढे ज्याला शिवाजीनगर भाग म्हणत ते भांबुर्डा गावठाण होते. जेथे कॉर्पोरेशनची इमारत आहे तेथे परगावी जाणाऱ्या खाजगी मोटार कंपन्यासाठी बसस्टँड होता. जंगली महाराज रोड ओलांडला की डाव्या हाताला ऑब्झवेटरी (वेधशाळा) इमारत व उजव्या हाताला इंजिनियरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे हॉस्टेल सोडले तर बाकी झाडी होती. गणेशखिंड रोडला तर गव्हर्नरांच्या बंगल्यापर्यंत (हल्लीचे पुणे विद्यापीठ) दोन्ही बाजूला मोठे वृक्ष होते. चतुश्रृंगी मंदीर गावाबाहेर होते.

शनवार वाड्यापासून सुरू होणारा शिवाजी रोड स्वारगेटपर्यंत जाई. तेथे गाव संपे. शिवाजीरोडच्या पूर्वेला मिश्र वस्ती व पश्चिमेला पांढरपेशा वर्ग अशी पुण्याची साधारण विभागणी होती.

~~~



~~~

# भिडे कुलसंमेलन - २०१५, नाशिक

२०१५ चे भिडे कुलसंमेलन नाशिक येथे घ्यावयाचे नाशिकमधील खालील स्थानिक कुलबंधू/भगिनींनी घेण्याचे ठरविले आहे. अर्थातच संमेलन यशस्वी होण्यासाठी स्थानिक मंडळीचा सहभाग मोलाचा आहे. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, विश्वस्त, कार्यकारिणी सदस्य व इतर भिडे मंडळी मदतीचा हात देण्यास सदैव कटीबद्ध आहेत. सहभागी होण्याकरिता नाशिकमधील स्थानिक भिडे कुलबंधू/भगिनी/माहेरवाशीणींनी खालील व्यक्तीना संपर्क करावा.

१) अॅड. अविनाश भिडे, ९४२२२५६२११    २) श्री. माधव ना. भिडे, ०२५३-२३८४०१३    ३) श्री. चैतन्य भिडे, ९८१९२३३८४५
४) सौ. संगिता भिडे, ९८६०५९९६१०८



## सस्नेह निमंत्रण

श्री नृसिंह जयंती उत्सवानिमित्त गुरुवार १३ मे २०१४ रोजी सायं. ७ ते १० तीर्थप्रसादास अवश्य यावे ही विनंती.

डॉ. मोरेश्वर वि. भिडे (सातारा)

कार्यकारिणी सदस्य (भिडे प्रतिष्ठान)

१८० रामाचा गोट, मनामती चौक, सातारा. मोबाईल : ९८२२४५१६६५

प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल इबीर
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
RNI No. M-6 (1457)/70-RNI

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७


# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

**AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES**

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : 5 to 10 H.P.
Output Capacity : 500 Kg / hr.
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : 15 to 20 H.P.
Output Capacity : 1 Tonn / hr.
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : 25 to 30 H.P.
Output Capacity : 3 Tonn / hr.
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : 2 H.P./3 H.P./5 H.P.
Output Capacity : 200 Kg / hr., 400 Kg / hr., 600 Kg / hr.
Motor driven & Engine Driven Model also available

**INDUSTRIAL PRODUCTS**

**PISTON VALVES (FOR STEAM-LINE)**



IBR & Non IBR Piston Valve
Class 150, Class 300 & PN 40
Size 15 mm to 150 mm

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**




Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²
Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.

**CASTINGS**



Heavy C.I. Castings
Maximum single piece - 2 Tonn

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



Castings :
Steel, Stainless Steel & S.G. Iron
Range - From 1 kg. To 100 kg.

**LADDLE**



Foundry Crane Laddles
Capacity : Upto 20 Ton


प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल इबीर
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
RNI No. M-6 (1457)/70-RNI